# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६
## (सकाळी ११-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**माहिती तंत्रज्ञान मंत्री :** महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **श्रीमती सना मलिक, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अलीकडील काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित स्मार्ट गॉगल्स, स्मार्ट ग्लासेस व इतर परिधान करता येणारी अत्याधुनिक उपकरणे मोठ्या प्रमाणावर बाजारात उपलब्ध झाली असून या उपकरणांद्वारे फोटो, व्हिडिओ, ध्वनीमुद्रण, थेट प्रसारण, चेहरा ओळख (Facial Recognition), कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने व्यक्तींची ओळख, संभाषणांचे विश्लेषण तसेच विविध प्रकारची वैयक्तिक माहिती संकलित करणे शक्य होत असणे, ही उपकरणे सामान्य चष्म्यांप्रमाणे दिसत असल्यामुळे संबंधित व्यक्तींच्या नकळत त्यांचे चित्रण अथवा ध्वनीमुद्रण होण्याची वाढलेली शक्यता, विशेषतः मंत्रालय, शासकीय कार्यालये, पोलीस ठाणी, न्यायालय परिसर, विमानतळे, रेल्वे स्थानके, ऊर्जा प्रकल्प, बंदरे, संरक्षणाशी संबंधित संवेदनशील स्थळे तसेच शैक्षणिक संस्था, रुग्णालये, धार्मिक स्थळे व सार्वजनिक ठिकाणे येथे अशा उपकरणांचा गैरवापर होऊन राष्ट्रीय सुरक्षा, राज्य सुरक्षा आणि नागरिकांच्या गोपनीयतेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता, तसेच महिलांची सुरक्षितता, अल्पवयीन मुलांचे संरक्षण, वैद्यकीय गोपनीयता, वैयक्तिक संभाषणे तसेच संवेदनशील शासकीय माहिती याबाबतही गंभीर प्रश्न निर्माण झाले असणे, याबाबत देशातील विविध सुरक्षा तज्ज्ञांनी अशा उपकरणांच्या वापराबाबत योग्य नियमन, सुरक्षा प्रोटोकॉल व कायदेशीर चौकट निर्माण करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात येणे, त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित स्मार्ट गॉगल्स व स्मार्ट ग्लासेसच्या वापराबाबत तसेच संवेदनशील ठिकाणी त्यांच्यावर नियंत्रणासाठी, नागरिकांच्या गोपनीयतेचे संरक्षण करण्यासाठी राज्य शासनातर्फे स्वतंत्र मार्गदर्शक तत्त्वे व कायदेशीर चौकट तयार करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(२) श्री. अमिन पटेल, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"दक्षिण मुंबईमध्ये वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत असणे, पाठकवाडी विद्युत बिघाड सुधारणा केंद्रामार्फत दक्षिण मुंबईमध्ये विद्युत बिघाड दुरुस्ती केली जाणे, पाठकवाडी केंद्रावर संपूर्ण दक्षिण मुंबईतून वीज पुरवठा खंडित होण्याच्या तक्रारी येत असल्याने या केंद्रावर अनेकदा ताण येत असणे, दक्षिण मुंबईमध्ये १२०० च्या आसपास विद्युत पुरवठा बिघाड संदर्भात तक्रारी प्रलंबित (Backlog) असणे, ग्राहक सेवा केंद्रात तक्रारी नोंद करण्यासाठी संपर्क केला असता तिथे फोन न उचलल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण होणे, विभागवार समस्या निवारण करण्यासाठी बिघाड दुरुस्ती केंद्राला सुमारे २ वर्षांचा कालावधी लागणे, या केंद्रावर कार्यरत कर्मचाऱ्यांसह बिघाड दुरुस्तीसंदर्भात लागणाऱ्या साधनांची तसेच केबलची देखील मोठ्या प्रमाणात कमतरता असणे, ओव्हरहेड केबलद्वारे अनेक ठिकाणी वीज पुरवठा करण्यात येणे, भविष्यात मोठी दुर्घटना घडल्यास येथे जीवितहानी होण्याची शक्यता असणे, तसेच मुंबईतील सायन-कोळीवाडा भागातील कोकरी आगार, जय महाराष्ट्र नगर, नाईक नगर, कामराज नगर, मोतीलाल नेहरू नगर, विजय नगर, संगम नगर व आजूबाजूच्या झोपडपट्टी भागात मागील काही महिन्यांपासून वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असणे, या सततच्या वीजखंडिततेमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून लघुउद्योग आणि छोटे व्यावसायिक यांचे आर्थिक नुकसान होत असणे, पाणीपुरवठा व आरोग्य सेवा वारंवार विस्कळीत होत असणे, यास्तव संपूर्ण विद्युत वितरण व्यवस्थेचे तातडीने तांत्रिक सर्वेक्षण करून आवश्यक तेथे उच्च क्षमतेच्या केबल्स, नवीन सब-टेशन व इतर पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) श्री. प्रविण तायडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती जिल्ह्यातील अचलपूर व चांदूर बाजार या तालुक्यांमध्ये मातोश्री पांदण रस्ते या योजने अंतर्गत काही पांदण रस्त्यांची कामे न करताही त्या रस्त्यांचे पैसे काढण्यात आले असणे, काही रस्ते तर शेतकऱ्यांकडून लोकवर्गणी जमा करून १ कि.मी. रस्ता २०० फूट करण्यात येणे, परंतु देयक पूर्ण काढण्यात आलेले असणे, शिरजगाव कसबा, करजगाव, शहापूर, वडूरा, धानोरा पूर्णा, कोटगावंडी, या ठिकाणी लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष पाहणी केली असता, मातोश्री पांदण रस्ते योजनेअंतर्गत रस्त्यांची कामे अपूर्ण असताना पूर्ण झाल्याचे कागदोपत्री दर्शवून बनावट देयक काढण्यात येणे, असे एकूण २५ ते ३० अपूर्ण रस्त्यांची कामे पूर्ण न करता बनावट देयके काढलेली असणे,अर्धा कि.मी. रस्त्याचे बांधकाम करून १ कि.मी. रस्त्याचे काम झाले असे दाखवलेले असणे, या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून याची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**चार : सन २०२६-२०२७ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस)**

(१) नगरविकास विभाग

(२) सार्वजनिक बांधकाम विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**
**(चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ५.३० वाजता)**

**पाच : शासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२६

---

**(ब) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ - महाराष्ट्र मुद्रांक (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०२६

---

**(क) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ७ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

**(ख) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख**, **विजय वडेट्टीवार**, **अमीन पटेल**, **नाना पटोले**, **विकास ठाकरे**, **श्रीमती ज्योती गायकवाड**, **डॉ.विश्वजित कदम**, **सर्वश्री.साजिद पठाण**, **हेमंत ओगले**, **रामदास मसराम**, **अमित झनक व डॉ.नितीन राऊत**, **वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ८ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

(ख) **सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम**, **वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.भास्कर जाधव व हारुन खान, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(ड) **विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(१) **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ६ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

(ख) **सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६**

---

(२) **सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६**

**सहा : (सोमवार, दिनांक २९ जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री. सुनिल प्रभू, डॉ.नितिन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमिन पटेल, संदिप क्षीरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनील राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, श्रीमती ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, अनिल मांगुळकर,**

**गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"महाराष्ट्र शासनाने गृहनिर्माण धोरण जाहिर करणे, तथापि सदर गृहनिर्माण धोरणाची अद्याप पर्यंत पूर्णपणे अंमलबजावणी न होणे, राज्य शासन, एमएमआरडीए, पोलीस, शासनाची महामंडळे इत्यादींच्या कर्मचाऱ्यांसाठी मुंबई शहरातील वांद्रे, वरळी, घाटकोपर, मालाड, गोरेगाव व मरोळ इत्यादी ठिकाणी शासकीय वसाहती असणे, सदर वसाहती अत्यंत जीर्ण झालेल्या असणे, त्यांची योग्य प्रकारे दुरुस्ती व देखभाल होत नसणे, सदर वसाहतींमध्ये राहणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची घरे मालकी हक्काने देण्याची होत असलेली मागणी, मुंबई शहरातील अरुंद रस्ते विकसित करताना येथील झोपड्या निष्कासित करुन २ किलोमीटरच्या परिसरात पर्यायी घरे देण्याची होत असलेली मागणी, यासाठी एसआरए, म्हाडा व महापालिकेकडून प्रकल्पग्रस्तांना घरे देण्यासाठी त्याच परिसरात इमारतींची निर्मिती करणे आवश्यक असणे, प्रकल्पबाधित रस्त्यामधील घरे २०११ च्या सशुल्क धोरणानुसार देवनार येथे पर्यायी घरे देण्याबाबत महापालिकेने घेतलेला निर्णय, या निर्णयास नागरीकांचा असलेला विरोध, इमारतींच्या विकास कामांसाठी होत असलेली बेसुमार वृक्षतोड, वृक्षतोडीमुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास, मुंबईतील फुटपाथवरील वाढते अतिक्रमण, ठाणे महानगरपालिकेअंतर्गत सुमारे २,८००/- कोटी रुपयांचा उघडकीस आलेला टीडीआर घोटाळा, ठाणे शहरातील कोठारी कंपाऊंडमध्ये झालेले मोठ्या प्रमाणावरील अनधिकृत बांधकाम, मिरा भाईंदर महापालिकेतील गैरव्यवहार व कांदळवनांवर (मँग्रोव्ह) मातीचा भराव टाकून पाण्याची योजना मंजूर करणे, सन २००० मध्ये कळस गावाचा पुणे महानगरपालिकेत समावेश होऊनही स.नं. १२६ मधील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची जागा मनपाने ताब्यात घेतलेली नसणे व जागा मालकांना मोबदलाही दिलेला नसणे, परिणामी अंत्यविधीसाठी जाणाऱ्या नागरिकांना रस्ता वापरण्यासाठी जागा मालकांशी करार करून पैसे द्यावे लागणे, ही अत्यंत गंभीर व नागरिकांच्या मूलभूत हक्कांशी संबंधित बाब असणे, तसेच पुणे विकास आराखड्यातील विश्रांतवाडी चौक ते धानोरी मुख्य रस्ता गेली तीस वर्षे होऊनही अरुंद असल्याने प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागणे, राज्यातील सर्वच महानगरपालिकांमध्ये विविध विकासकामे, पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन व सार्वजनिक सेवा यांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असणे, कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही अनेक शहरांतील रस्त्यांची दुरवस्था, अपुरी स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठ्यातील अनियमितता, वाहतूक कोंडी आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या मूलभूत समस्यांमध्ये अपेक्षित सुधारणा झालेली दिसून न येणे, शहरातील वाढत्या प्रदुषणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, यामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय होऊन नागरिकांच्या कररूपाने जमा झालेल्या पैशांचा योग्य वापर होत नसल्याची भावना जनतेमध्ये निर्माण होणे, राज्यातील महानगरपालिकांमधील मागील काही वर्षांतील विकासकामांची स्वतंत्र चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही."

सात : **सर्वश्री अमित साटम, रमेश बोरनारे, दिलीप वळसे-पाटील, योगेश सागर, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, चेतन तुपे, कालिदास कोळंबकर, दिपक केसरकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. तानाजी सावंत, श्री. अनिल पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री राजेंद्र गावित, धर्मरावबाबा आत्राम, संजय उपाध्याय, विजय शिवतारे, राजकुमार बडोले, मिहीर कोटेचा, राजेश क्षिरसागर, संजय बनसोडे, पराग शाह, प्रदिप जैस्वाल, सर्वश्रीमती सुलभा खोडके, विद्या ठाकूर, डॉ. बालाजी किणीकर, श्री. शेखर निकम, कॅ. आर. तमील सेल्वन, सर्वश्री विलास तरे, प्रताप पाटील-चिखलीकर, राम कदम, चंद्रदीप नरके, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रविंद्र चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, दिलीप बनकर, संजय केळकर, मंगेश कुडाळकर, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री किसन कथोरे, किशोर पाटील, राजेश विटेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री शांताराम मोरे, सुनिल शेळके, प्रशांत ठाकूर, प्रकाश सुर्वे, चंद्रकांत नवघरे, महेश चौघुले, निलेश राणे, काशिनाथ दाते, नरेंद्र मेहता, तुकाराम काते, सचिन पाटील, महेश बालदी, अशोक पाटील, मनोज कायंदे, कुमार आयलानी, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री राजन नाईक, बालाजी कल्याणकर, श्रीमती स्नेहा दुबे, श्री. सुहास कांदे, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री संजय गायकवाड, हरिश्चंद्र भोये, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री रविशेठ पाटील, महेंद्र थोरवे, सिध्दार्थ शिरोळे, महेंद्र दळवी, प्रविण दटके, चंद्रकांत पाटील, मोहन मते, संतोष बांगर, सुनिल कांबळे, विश्वनाथ भोईर, महेश लांडगे, दिलीप लांडे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री महेश शिंदे, शंकर जगताप, आमश्या पाडवी, हेमंत रासने, हिकमत उढाण, भिमराव तापकीर, बाबुराव कदम-कोहळीकर, डॉ. संजय कुटे, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री रणधीर सावरकर, मुरजी पटेल, सुमित वानखेडे, आनंद तिडके, सुधीर मुनगंटीवार, अमोल पाटील, विनोद अग्रवाल, सुहास बाबर, राजेश बकाने, विलास भुमरे, चरणसिंग ठाकूर, राजेश मोरे, विक्रम पाचपुते, विठ्ठल लंघे, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किरण सामंत, बबनराव लोणीकर, राजेंद्र यड्रावकर-पाटील, प्रशांत बंब, शरददादा सोनावणे, अभिमन्यु पवार, डॉ.अशोकराव माने, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री सुरेश भोळे, सुरेश धस, अतुलबाबा भोसले, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री अनुपभैय्या अग्रवाल, अमोल जावळे, सचिन कल्याण-शेट्टी, गोपिचंद पडळकर, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री किशोर जोरगेवार, रत्नाकर गुट्टे, शिवाजी पाटील, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री अक्षय कर्डिले, राघवेंद्र पाटील, सुभाष देशमुख, हरिष पिंपळे, विजय देशमुख, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, प्रताप अडसड, देवराव भोंगळे, राजेश पवार, श्रीमती नमिता मुंदडा, श्री. जितेश अंतापुरकर, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री रवी राणा, राणाजगजितसिंह पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अमल महाडिक, समाधान आवताडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"'मुंबई, ठाणे व कल्याण महानगरपालिकांच्या निवडणूका होऊन महानगरपालिका सभागृहांची स्थापना झाल्यानंतर मागील काही महिन्यांमध्ये महानगरपालिकांच्या प्रशासनात पारदर्शकता व कार्यक्षमता राहण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण सुधारणा करण्यात येणे,

मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येणाऱ्या २७ वस्तूंची खरेदी तसेच आरोग्य विभागाची खरेदी 'जेम' पोर्टलमार्फत करण्यात येणे, सुमारे १ हजार कोटींची अनावश्यक निविदा रद्द करण्यात येणे, गारगाई-पिंजाळ जल प्रकल्पाच्या खर्चामधून सुमारे २८० कोटींची बचत करण्यात येणे, महानगरपालिका रुग्णालयांमधील रुग्णसेवा व रुग्णस्थिती प्रणाली ऑनलाईन करण्यात येणे, शहरातील स्वच्छतेस प्रोत्साहन देण्यासाठी 'मुंबई क्लीन लीग' स्पर्धा सुरु करण्यात येणे, मुंबई शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी बांधकाम व पाडकाम कचरा (C & D Waste) व्यवस्थापन धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणे, मुंबई (अंधेरीतील सबवेसह) विविध भागात पावसाळयात साचणाऱ्या पाण्यापासून संरक्षण देण्यासाठी आयआयटी, मुंबईच्या, सहकार्याने सर्वसमावेशक पूरनियंत्रण आराखडा तयार करुन केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणे, अंधेरी पूर्व येथे शासनाचे सुसज्ज रुग्णालय निर्माण करण्याची आवश्यकता, अंधेरी पूर्व येथील सुभाषनगर या झोपडपट्टीत पाणी पुरवठा करण्यासाठी डोंगरमाथ्यावर जलकुंभ बांधण्याची आवश्यकता, मुंबईतील पार्किंग समस्येच्या निराकरणासाठी २७ प्रशासकीय विभागांमध्ये भूमिगत पार्किंग सुविधा करण्याकरिता अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येणे, १४ वर्षांच्या मुलींना मोफत एचपीव्ही लस देण्याची मोहिम सुरु करण्यात येणे, यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता, तसेच महानगराची लोकसंख्या आणि मिळणारे पाणी यामध्ये ६०० एमएलडीची तफावत असल्याने २०३०-३२ पर्यंत पाण्याची मोठया प्रमाणावर लागणारी आवश्यकता, या बाबी विचारात घेता दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी पर्यायी जलस्त्रोतांचा शोध घेण्यात येणे, शहरातील नैसर्गिक तलाव, तळी व जलाशय याचे पुर्नरुज्जीवन करणे, तसेच प्रस्तावित डिसॅलिनेशन प्रकल्पाची क्षमता वाढविण्याची आवश्यकता, मुंबई शहरातील वाढत्या घनकचऱ्यांचे शास्त्रोक्त प्रक्रियेद्वारे व्यवस्थापन करुन 'वेस्ट टु एनर्जी' तत्वावर वीज निर्मिती प्रकल्पांना चालना देण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेतील जन्म व मृत्यू दाखल्याच्या नोंदीमध्ये सुमारे ८७ हजार प्रकरणात फेरफार झाल्याचे व १८ हजार प्रकरणांमध्ये अनियमितता आढळून आल्याचे निदर्शनास येणे, संबंधित दोषींवर कठोर कारवाईची आवश्यकता, मुंबईतील एअरपोर्ट फनल झोन मधील बाधित इमारती तसेच एसआरओ १५० जुहू मिलिटरी ट्रान्समिशन स्टेशन मधील पुनर्विकासाकरिता 'हौसिंग फॉर ऑल' पॉलिसीअंतर्गत संबंधितांना दिलासा देण्यासाठी नियम करणे, खुल्या सार्वजनिक जागांबाबतचे तसेच फेरीवाला क्षेत्राचे धोरण अंतिम करण्याची आवश्यकता, आयआयटी मुंबईच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या पूरनियंत्रण प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, मुंबईतील जवळपास ५० टक्के लोकसंख्या झोपडपट्टीमध्ये असून तेथील स्वच्छता व्यवस्थापनासाठी राबविण्यात येणारी 'दत्तक वस्ती योजना' अपेक्षित परिणाम साधण्यात अपयशी ठरत असल्याने त्यात व्यापक सुधारणा करण्याची आवश्यकता, बीडीडी चाळी व धारावी पुनर्विकासाला चालना मिळणे, स्वयं पुनर्विकासाकरिता एक वेगळे प्राधिकरण नेमून त्याची अंमलबजावणी करण्यात येणे, पागडीच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून करण्यात आलेल्या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, वांद्रे ते वर्सोवा सीलिंकचे काम सुरु असून वर्सोवा ते भाईंदर या उत्तर दिशेच्या कोस्टल रोडचे काम सुरु असल्यामुळे मुंबई व एमएमआर विभागातील वाहतूकीच्या समस्येचे निवारण होत असणे,

साधारणतः ५० टक्के मेट्रोचे काम पूर्ण झाले असून उर्वरित ५० टक्के काम जलदगतीने सुरु असणे, मुंबईची वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई शहरामध्ये सागरी मार्ग (वॉटरवेज ट्रान्सपोर्ट) सुरु करण्याकरिता स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना होणे, क्रांतीनगर ते गोरेगाव या १२० फुटांच्या डीपी रोडचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची आवश्यकता, कांदळवन क्षेत्रांमध्ये सन २००० पूर्वीपासून वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टीधारकांना शासनाच्या विद्यमान धोरणानुसार कोणतेही संरक्षण उपलब्ध नसणे, त्यामुळे सदर पात्र झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी विशेष धोरण निश्चित करुन तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असणे, तसेच मुंबई शहराचा सर्वांगीण विकास व मुंबई शहरातील घरकुल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(सोमवार, दिनांक २९ जून, २०२६ रोजी बॅलेटद्वारे काढण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.**

"भुसावळ (दीपनगर) (जि.जळगांव) तालुक्यातील औष्णिक विद्युत केंद्रात 'पॉड अॅश' विक्री लिलाव प्रक्रियेमध्ये झालेली अनियमितता" या विषयावरील श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३१७१३ ला दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(२) श्री. सुभाष देशमुख, वि.स.स.**

"सोलापूर मधील महानगरपालिकेचे महात्मा गांधी प्राणीसंग्रहालय बंद असल्याबाबत" या विषयावरील श्री. सुभाष देशमुख व इतर वि.स.स. यांचा दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३३ मधील प्रश्न क्रमांक २८३० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(३) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"राज्यातील वैधानिक विकास महामंडळांचे पुनर्गठन करून प्रादेशिक समतोल राखणेसह विदर्भाचा वाढता अनुशेष दूर करण्याबाबत" या विषयावरील श्रीमती सुलभा खोडके व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३२९३२ ला दिनांक २३ जून, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २९ जून, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.